# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा. क्र./ गों. वि. /म. वि. वि. वि./१०२/२०२४ दि.२४/०१/२०२४

***अत्यंत तातडीचे/कालमर्यादेत***

## परिपत्रक
## (अनुदानित महाविद्यालयांकरिता)

**विषय :-** उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकिय आस्थापना तसेच अशासकिय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ :-** शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/प्रशा-१/संकिर्ण/मराठा समाज/४८३/२०२४ दिनांक २३ जानेवारी २०२४

उपरोक्त संदर्भांकिंत विषयांन्वये विद्यापीठाशी संलंग्नित अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, मराठा समाजाच्या मागासलेपणाची तपासणी करण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या कामाकाजासाठी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली अशासकिय अनुदानित महाविद्यालये येथिल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाची माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात **दिनांक २५/०१/२०२४ पर्यंत** उच्च शिक्षण संचालनालयाला पाठवावयाची असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रात माहिती भरुन सदर माहिती तात्काळ **दिनांक २४/०१/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या college.section@unigug.ac.in या ईमेल आयडी वर तातडीने सादर करावे. जेणेकरुन सदर माहिती शासनाकडे पाठविणे सोईचे होईल. सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेता प्राधान्याने माहिती सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सहपत्र :- शासनाचे पत्र व प्रपत्र संलग्नित**

मा. प्र- कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार

२४/०१/२४
(देवेंद्र एम झाडे)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,
अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलंग्नित अनुदानित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web :www.dhepune.gov.in दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६१२२११९/२६१२६९४० E-Mail : prash.dhepune@gov.in

क्र. उशिसं/प्रशा-१/संकीर्ण/मराठा समाज/ ४८३ मराठा आरक्षण माहिती /तातडीचे दिनांक : २३ जानेवारी, २०२४

23 JAN 2024

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय आस्थापना तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचे पत्र जा.क्र. प्र.क्र.८/२०२३/BSW /MSW/ वि. माहिती/१७६, दि. २० जानेवारी, २०२४

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या दि. २० जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्राचे अवलोक करावे.

सदरहू पत्रान्वये, मराठा समाजाच्या मागासलेपणाची तपासणी करण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या कामकाजासाठी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय आस्थापना तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच अकृषि विद्यापीठे येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची विहित प्रपत्रामध्ये दि. २५.०१.२०२४ पर्यंत आयोगास माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

तरी आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय आस्थापना तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच अकृषि विद्यापीठे येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात दि. २५ जानेवारी, २०२४ पर्यंत संचालनालयास सादर करावी. सदरहू विषयाचे गांभीर्य विचारात घेता, प्राधान्याने कार्यवाही करुन दिलेल्या मुदतीमध्येच माहिती संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय, पुणे १६

श्री ओव्हरवार
तातडीने कार्यवाही घ्यावी
२४/०१/२४

प्रत :- माहितीस्तव सादर.

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे १.

आवक क्र. ५२११ २४.१.२४

**विभागाचे नाव :-**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**शासकीय आस्थापना , अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच अकृषि विद्यापीठे येथील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची माहिती**

| तपशिल | अ.क्र. | शिक्षक / शिक्षकेतर | एकूण मंजूर पदे | एकूण भरलेली पदे | एकूण रिक्त पदे | रकाना 4 पैकी मराठा जातीच्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी अनु. जाती प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी अनु. जमाती प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी विमुक्त जाती प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी भटक्या जमाती (ब) प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी भटक्या जमाती (क) प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी भटक्या जमाती (ड) प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी (विमाप्र)विशेष मागास प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी (इमाव)इतर मागास प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या | रकाना 4 पैकी मराठा समाजा व्यतिरिक्त खुल्या प्रवर्गातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| अ) शासकीय आस्थापना ( शसकीय महाविद्यालये व संस्था तसेच खुद्द विभागीय सहसंचालक कार्यालय, वसतिगृहे, भा.प्र.से.पूर्व केंद्र) | 1 | शिक्षक | | | | | | | | | | | | | |
| | | शिक्षकेतर | | | | | | | | | | | | | |
| ब) अशासकीय अनुदानित महाविद्यालयीन आस्थापना | 2 | शिक्षक | | | | | | | | | | | | | |
| | | शिक्षकेतर | | | | | | | | | | | | | |
| क) अकृषि विद्यापीठाची आस्थापना | 3 | शिक्षक | | | | | | | | | | | | | |
| | | शिक्षकेतर | | | | | | | | | | | | | |
| **एकूण (अ+ब+क)** | 4 | शिक्षक | | | | | | | | | | | | | |
| | | शिक्षकेतर | | | | | | | | | | | | | |

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

नवीन प्रशासकीय इमारत खोली क्र. ३०७, तिसरा मजला, विधान भवना समोर, पुणे- ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०- २६०५३०५६ ई.मेल. msbccpune@gmail.com

जा.क्र. /प्र.क्र.८/२०२३/BSW/MSW/वि. माहिती/१७६ दिनांक :२० जानेवारी २०२४

प्रति,

मा. प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय : आपल्या अधिपत्याखालील अकृषी विद्यापीठ विभाग तसेच संलग्नित शासकीय व अनुदानित - विनाअनुदानित महाविद्यालयातील अ) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची प्रपत्र माहिती, ब) सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विहित प्रपत्रात उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र. MISC-२०२३/Cr११५/१६C,
दि. १३ नोव्हेंबर २०२३ रोजीचे पत्र

महोदय,

महाराष्ट्र शासनाकडील संदर्भाधीन पत्रान्वये मराठा समाजाची मागासलेपणाची तपासणी करण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविले आहे. सदर कामकाजासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास आपल्या अखत्यारीतील अकृषी विद्यापीठ विभाग तसेच संलग्नित शासकीय व अनुदानित - विनाअनुदानित महाविद्यालयातील अ) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची प्रपत्र माहिती, ब) सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात लवकरात लवकर शक्यतोवर दिनांक २५/०१/२०२४ रोजी पर्यंत आयोगास उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती.

आपली,

(आ.उ.पाटील)
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे ०१
३. मा.संचालक, तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे ०१